## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : ५८०/२०२२

तक्रारकर्ता, श्री.युवराज परशराम ठाकरे
कार्यालय ज्ञानदा प्रकाशन , तहसिल कार्यालया वाडा जवळ
ता.वाडा, जि.पालघर

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल
परिक्षेत्र वन अधिकारी, बदलापूर (संरक्षण) यांचे
कार्यालय, स्टेशन रोड, बदलापूर (प) ४२१ ५०३

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल
परिक्षेत्र वन अधिकारी, बदलापूर (संरक्षण) यांचे
कार्यालय, स्टेशन रोड, बदलापूर (प) ४२१ ५०३

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ३/७/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ५/७/२०२१ | १३/७/२०२१ | २०/८/२०२१ | १७/९/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.२/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ३/७/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय जयराम धारवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी बदलापूर व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद सदाशिव ठाकूर, वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनिकरण ठाणे उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *सन २०२०-२०२१ मध्ये आपल्या कार्यक्षेत्रात वनविभागाकडून राबविण्यात आलेल्या सर्व योजनांची माहिती विगतवारीप्रमाणे मिळावी*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.१७/९/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल बदलापूर यांना अपिलकार यांस सदरची माहिती ही त्यांनी मागणी केलेले कागदपत्रे आठ (८) दिवसांच्या आत विनामुल्य पुरविण्यात यावी अशी सुचना देण्यात आली.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.१३/७/२०२१ च्या पत्राव्दारे माहिती दिली आहे. सदर प्रत त्यांनी सादर केली.

तक्रारकर्ता यांना सुनावणी सूचना प्राप्त होऊन देखील ते सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांचे म्हणणे जाणून घेता आले नाही. उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते की, तक्रारकर्ता यांना माहिती दिली आहे.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३ जुलै, २०२५ .

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

Comp-३